# प्र सि द्धि प त्र क

महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा **रविवार दि. ३ डिसेंबर, २०२३** रोजी मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या चार विभागीय ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्रे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्यामार्फत खाली नमूद केलेल्या संबंधित विभागीय कार्यालयाकडे **दि.२३ ऑक्टोबर, २०२३** पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| **मुंबई व कोकण विभाग**<br>विभागीय सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, कोकण विभाग,<br>कोकण भवन, ३ रा मजला,नवी मुंबई - ४०० ६१४.<br>दुरध्वनी क्र.०२२-२७५७३५४२ | **पुणे व नाशिक विभाग**<br>विभागीय सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>नवीन मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे- ४११ ००१.<br>दुरध्वनी क्र.०२०-२६१२१७०९. |
| **नागपूर व अमरावती विभाग**<br>विभागीय सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, प्रशासकीय इमारत,<br>२ रा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.<br>दुरध्वनी क्र. ०७१२-२५६४९५६. | **औरंगाबाद विभाग**<br>विभागीय सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,औरंगाबाद - ४३१ ००१.<br>दुरध्वनी क्र. ०२४०-२३६१३७२ |

शासकीय सेवेतील अमराठी भाषिक राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा **रविवार दि.७ जानेवारी, २०२४** रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्रे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्यामार्फत या कार्यालयाकडे खाली नमूद केलेल्या पत्त्यावर **दि.३० नोव्हेंबर, २०२३** पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे.

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य,
भाषा संचालनालय, प्रशासकीय इमारत,
५ वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५५२१८४.

**अराजपत्रित कर्मचारी व राजपत्रित अधिकाऱ्यांची अनुक्रमे डिसेंबर २०२३ व जानेवारी २०२४ मधील मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा (प्रश्नपत्रिका क्र.१) ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत मंडळाच्या सुधारित अभ्यासक्रमाचे इयत्ता ९ वी साठी निश्चित केलेले "अक्षरभारती (द्वितीय भाषा)" या संपूर्ण पुस्तकावर आधारित घेण्यात येईल. मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा (प्रश्नपत्रिका क्र.१) ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत मंडळाचे सुधारित अभ्यासक्रमाचे इयत्ता १० वी साठी मार्च/एप्रिल २०१८ मध्ये निश्चित केलेले "अक्षरभारती (द्वितीय भाषा)" या संपूर्ण पुस्तकावर आधारित घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका क्र.२ च्या अभ्यासक्रमात कोणताही बदल नाही.**

**परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी उमेदवाराने आवेदनपत्र परिपूर्ण भरुन मूळ चलनासह संबंधित कार्यालयाकडे विहित मुदतीत पाठविणे आवश्यक आहे.** भाषा संचालनालयाच्या परीक्षेसंबंधीची व परीक्षा शुल्कासंबंधीची माहिती **directorate.marathi.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

(स्वाक्षरी)
**भाषा संचालक**
**महाराष्ट्र राज्य.**

**मुंबई.**
**दिनांक :** १८ सप्टेंबर,२०२३